॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## ACADEMIC PLANNIG & DEVELOPMENT SECTION

Fax: (02462) 215572 Phone: (02462)215542 Website: srtmun.ac.in E-mail: apds@srtmun.ac.in

*राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रभावी अंमलबजावणीकरिता दि. ०४ ऑक्टोबर २०२२ रोजी शिक्षकांसाठी जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्याबाबत. .*

## :परिपत्रक :

दि. २६ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० अंमलबजावणीच्या अनुषंगाने आयोजित सर्व प्राचार्यांच्या बैठकीत मा. कुलगुरू महोदयांनी सूचित केल्यानुसार **दि. ०४ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता** विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व शिक्षकांसाठीच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे.

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक घटकांचा सहभाग असावा या उद्देशाने विविध कार्यप्रणाली मा. कुलगुरू महोदयांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. त्यानुसार एकाच वेळी विद्यापीठ परिक्षेत्रातील चारही जिल्हयांमध्ये शिक्षकांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत असून या कार्यशाळेस राज्याचे माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री चंद्रकांत पाटील, माननीय उच्च व तंत्र शिक्षण विभाग, प्रधान सचिव श्री विकासचंद्र रस्तोगी, मा. संचालक, उच्च शिक्षण डॉ. धनराज माने, माननीय कुलगुरू डॉ. उद्धव भोसले व माननीय प्र–कुलगुरू डॉ. जे. एम. बिसेन हयांचे तसेच विविध तज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. सदर कार्यशाळेस सर्व महाविद्यालयांतील सर्वच शिक्षकांनी त्या त्या जिल्हयांच्या नियोजित स्थळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. कार्यशाळेस उपस्थित राहण्यासाठी शिक्षकांना संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी/संकुलाच्या संचालकांनी कार्य रजा मंजूर करावयाची आहे. कार्यक्रमस्थळी सहभागी शिक्षकांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रमाची रूपरेषा सोबत जोडली आहे.

**कार्यक्रमस्थळ खालील प्रमाणे आहेत–**

| क्र. | जिल्हा | आयोजक महाविद्यालयाचे नांव | कार्यक्रम स्थळ |
|---|---|---|---|
| १ | नांदेड | यशवंत महाविद्यालय, नांदेड | कुसुम सभागृह, नांदेड. |
| २ | लातूर | दयांनद कला महाविद्यालय, लातूर | दयानंद सभागृह, लातूर |
| ३ | परभणी | श्री शिवाजी कॉलेज, परभणी | श्री शिवाजी कॉलेज, परभणी |
| ४ | हिंगोली | आदर्श महाविद्यालय, हिंगोली | आदर्श महाविद्यालय, हिंगोली |

मा.कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार सर्व प्राचार्यांना/संचालकांना विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक आपल्या महाविद्यालयांतील/संकुलातील सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणावे व त्यांना कार्यशाळेस उपस्थित राहण्याच्या सूचना कराव्यात. तसेच किमान २ ते ४ शिक्षकांची विद्यार्थ्यांच्या कार्यशाळेचे आयोजन करून मार्गदर्शन करण्यासाठी निवड करण्यात यावी. त्या शिक्षकांची नांवे व माहिती विद्यापीठास apds.srtmun@gmail.com या ईमेल आयडीवर दि. ०८ ऑक्टोबर २०२२ पूर्वी सादर करावी.

**टिप : सदर कार्यशाळेसाठी उपस्थितांना प्रवास व दैनंदिन भत्ता देय राहणार नाही.**

जा.क्र.:शैनिविवि/परिपत्रक/राशैधो–शिक्षक कार्यशाळा/२०२२–२३/689
दिनांक : ३० सप्टेंबर २०२२

**सहा.कुलसचिव**
शैक्षणिक नियोजन व विकास विभाग

**प्रति,**

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये व न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली प्रस्तुत विद्यापीठ.

मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर व उपपरिसर लातूर आणि परभणी.

**प्रत माहितीस्तव** : १.मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ. २. मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ. ३. मा. कुलसचिव प्रस्तुत विद्यापीठ. ४. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.

५. सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करावे.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० प्रभावी अंमलबजावणीसाठी

जिल्हास्तरीय कार्यशाळा (आभासी व प्रत्यक्ष)

**: कार्यक्रमाची रूपरेषा :**

दिनांक ०४ ऑक्टोबर २०२२ (मंगळवार) वेळ : दुपारी ३.०० ते ६.१५

| वेळ | कार्यक्रमाचे स्वरूप |
|---|---|
| ३.०० | जिल्हानिहाय कार्यक्रमस्थळी संबंधित जिल्हयातील शिक्षकांची उपस्थिती नोंदणी |
| ३.१० | मा. प्र–कुलगुरू डॉ. जे.एम.बिसेन व मा. कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० संदर्भातील प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश व अनुषंगिकबाबींवर मार्गदर्शन. |
| ३.५० | मा. संचालक उच्च शिक्षण डॉ. धनराज माने यांचे कार्यक्रमास आभासी आगमन आणि मार्गदर्शन (online) |
| ४.०० | मा.उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव श्री विकासचंद्र रस्तोगी यांचे मंत्रालय, मुंबई येथून आभासी (online) कार्यक्रमास आगमान. |
| ४.०० | मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य श्री चंद्रकांत पाटील यांचे मंत्रालय, मुंबई येथून आभासी (online) कार्यक्रमास आगमान. |
| ४.०० | स्वागत व प्रस्तावनापर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण–२०२० अंमलबजावणीचा आढावा |
| ४.०५ | मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग श्री विकासचंद्र रस्तोगी यांचे मार्गदर्शन (online) |
| ४.२० | मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य श्री चंद्रकांत पाटील यांचे मार्गदर्शन (online) |
| ४.३० | समारोप– मा. कुलगुरु डॉ. उद्धव भोसले (online) |
| ४.३५ | आभार प्रदर्शन – मा. कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे (online) |
| **आभासी (online) कार्यक्रमाचे प्रत्येक कार्यक्रमस्थळी प्रक्षेपण करण्यात येईल. त्यानंतर प्रत्यक्ष (off line) कार्यशाळेची सुरूवात होईल.** | |
| ४.४० | जिल्हानिहाय नियोजित स्थळी विविध तज्ञांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन (off line) |
| ६.०० | प्रश्नोत्तरे व संवाद (off line) |
| ६.१५ | आभार प्रदर्शन व समारोप (off line) |